**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र. ७**
**सभावृत्तांत**

दिनांक :- १६/९/२०१५ वेळ :- दु. १२.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १६/९/२०१५ रोजी दु. १२.१५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव - अध्यक्ष
२. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३. मा.शमीम पठाण
४. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
५. मा.डोके अपर्णा निलेश
६. मा.को-हाळे अनंत सुभाष
७. मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख
८. मा.गावडे जयश्री वसंत
९. मा.साबळे छाया जगन्नाथ
१०. मा.जगताप विमलताई सुरेश
११. मा.पवार आप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
१२. मा.बारणे निलेश हिरामण
१३. मा.बारणे माया संतोष
१४. मा.ओव्हाळ शेखर अशोक
१५. मा.पवार यमुनाताई रमणनाना
१६. मा.गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश
१७. मा.कलाटे स्वाती मयूर
१८. मा.पाषाणकर गोरक्ष दशरथ स्वीकृत सदस्य
१९. मा.शेडगे गिरीष ज्ञानेश्वर --"--
२०. मा.लुणावत शरद माणिकचंद --"--

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. सुभाष माछरे - .क्षेत्रिय अधिकारी, मा.रविंद्र जाधव प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा.गटटुवार - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा.सी.एन.धानोरकर – उपअभियंता, स्थापत्य , मा.एन.आर.निंबाळकर – उपअभियंता स्थापत्य, मा.संध्या वाघ, उपअभियंता , स्थापत्य मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य, मा.पी.बी.पाटील - उपअभियंता, विदयुत विभाग मा.भाऊसाहेब साबळे – उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.बोरावके डी.एच - उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.सुधाकर कुदळे – उपअभियंता, जलनिसारण विभाग,

श्रीम.पाठक ए.ए. - उपअभियंता, झोनिपु विभाग, मा.मिनानाथ इनामदार – लेखाधिकारी, श्री.जी.एस.देशपांडे – मुख्य आरोग्य निरिक्षक, इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. ५, दि. १९/८/२०१५ व कार्यपत्रिका क्र.६ दिनांक २१/०८/२०१५ रोजी झालेल्या विशेष सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

तदनंतर **उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक २ गॅस शवदाहिनी चिंचवड स्मशान भूमीमध्ये बसविणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ३ पिंपरी भाजीमंडईमधील उपलब्ध असणारे भाजी मंडई ओटे ११ महिन्यासाठी अटी शर्तीनुसार व नगररचना निश्चीत करेल त्या भाडेदराने भाडेतत्वावर देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ४ पिंपरी चिंचवड मनपाच्या वाकड प्रभागातील संत तुकाराम मंगल कार्यालयाजवळून २४ मी.डी.पी.रोड झालेला आहे या रस्त्यास दिनांक १४/८/२०१४ रोजी कै.शंकरराव श्रीपतराव गायकवाड असे नांव देवून ठराव मंजूर करण्यात आलेला होता. सदरचा ठराव रदद करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ५ प्रभाग क्रमांक २० मध्ये बिजलीनगर हनुमान स्वीटसमोरील चौकास कै.रामभाऊ पिराजी सुर्यवंशी चौक असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ६ प्रत्येक प्रभागात दोन सदस्य आहेत त्यानुसार प्रभागात रस्ते, क्रिंडागण, चौक , उदयान व इतर ठिकाणी नांवे देणेबाबत ठराव करतेवेळी जो प्रस्ताव येतो त्यास प्रस्तावास स्थानिक दोन्ही नगरसदस्याची सही असलेचे पत्र व उपस्थीती असल्याशिवाय विषय घेवू नये. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणाबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ७ सांगवी फाटा –रावेत बी.आर.टी. संचलनासाठी बस थांब्याची नांवे निश्चीती करण्यात आली असून, सदर ठिकाणी बसटॉप उभारणी केल्यानंतर पिंपरी चिंचवड मनपा कडून बसस्टॉपची यादी दिलेली होती. सध्या स्थीतीला सोळानंबर हे बसस्टॉपचे नांव देण्यात आले आहे. परंतु सोळानंबर हा बसस्टॉप हा सध्या अस्तीत्वात नाही. सध्या बीआरटीने जो बसस्टॉप बांधला आहे तो संतोषनगरच्या हददीत येत आहे. तरी सोळा नंबरचे नांव वगळून सदर बीआरटी बस स्टॉपला संतोषनगर असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ८  दिनांक १९/८/२०१५ रोजी मंजूर झालेला ठराव  क्रमांक ३० रदद करुन नवीन ठराव मंजूर करुन मुस्लीम  कब्रस्तान नवीन नामकरणामध्ये हजरत उस्माने गणी कब्रस्तान असे नांव  देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ९  क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील  अनाधिकृत जाहीरात फलक काढणेकामीच्या प्रस्तावास मान्यता  देणेबाबत विचार करणे .

विषय क्रमांक १०  पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभाग क्रमांक २३  केशवनगर येथे राजपार्क चौक येतो त्या चौकात संग्राम चौघुले यांची जीम असून, तेथे बजाज सर्व्हीसेसचे गॅरेज आहे त्या चौकास कै.सुरेश काका गावडे चौक असे नामकरण  नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

ठराव क्र. ४० — विषय क्र. १
दि. १६/९/२०१५ — विभाग - १) स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
२) विदयुत विभाग
३) पर्यावरण अभियांत्रीकी विभाग

सुचक :  मा. शमिम पठाण — अनुमोदक: मा. स्वाती कलाटे

संदर्भ :- मा. झामाबाई बारणे  यांचा दिनांक १७/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

विषय :- थेरगांव येथील स.नं.२२/५ मधील क्षेत्र १ हेक्टर ०० आर या मिळकतीचा आगाऊ  ताबा  पिंपरी चिंचवड मनपास अ, ब पत्राव्दारे  ज्या जमीन मालकाच्या मालकीची जमीन त्यांनी आरक्षण क्रमांक ६२८  खेळाचे  मैदानसाठी दिलेले आहे. सदर खेळाचे मैदानास कै.रामभाऊ  मोरु बारणे व कै.बारकु मोरु बारणे असे नांव देवून नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास  मान्यता देणेबाबत  विचार करणे

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत  यावा

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

.

ठराव क्र. ४१ — विषय क्र. २
दि. १६/९/२०१५ — विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक :  मा. शमिम पठाण — अनुमोदक: मा. आश्विनी चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांचा दि. १६/९/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

मनपाची चिंचवड लिंकरोड भाटनगर जवळ चिंचवड स्मशानभूमी आहे. सदर स्मशानभमीमध्ये पर्यावरणदृष्टया गॅस दाहिनी बसविणे आवश्यक आहे. तरी चिंचवड येथील स्मशानभमीमध्ये मनपा पर्यावरण अभियांत्रीकी  विभागामार्फत नियमानुसार गॅस दाहिनी बसविणे  तसेच पुर्वीची स्मशानभूमीचे पत्रे दुरुस्त करणे, बसण्यासाठी नविन पत्राशेड व बसण्यासाठी बाक बसविण्याकामीच्या प्रस्मावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४२ — विषय क्र. ३
दि. १९/८/२०१५ — विभाग –  भूमी जिंदगी विभाग

सुचक : मा. शमीम पठाण अनुमोदक: मा.आश्विनी चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांचा दि. १६/९/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मनपाची पिंपरी येथे १८० गाळयांची भाजीमंडई आहे. सदर भाजीमंडईलगत मनपाने बावीस भाजीमंडई ओटे बांधलेले आहेत. सदर भाजीमंडई ओटे भुमी जिंदगी विभागाने वितरीत केलेले आहेत. त्यानुसार सदर भाजीमंडई ओटे वितरण कालावधी व करारनाम्याची मुदत संपलेली आहे. काही भाजीमंडई ओटे रिक्त आहेत त्याची माहिती भुमी जिंदगी विभागातून घेवून उपलब्ध भाजीमंडई ओटे मा.आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्रमांक भुजि/१/कावि/१५६/२०१३, दिनांक २०/४/२०१३ मधील अटी शर्तीनुसार अकरा महिने कालावधीसाठी खालील नमुद केलेल्या नागरीकांना आवश्यक कागदपत्रानुसार नगररचना विभाग निश्चीत करेल त्या दराने स्वखर्चाने करारनामा करुन अकरा महिने भाडयाने देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

१ महेश तानाजी गरुड २. सागर तानाजी गरुड ३. राहूल भन्साळी ४. शरीफ महंमद तांबोळी ५. उमेश बजरंग खेंगरे ६. संजय उभे ७. गागरे योगेश ८. सुदाम हुशार ९. जाधव त्र्यंबक १०. विशाल गावडे ११. उमेश संभाजी गरुड १२. योगेश वसंत कदम १३. प्रशांत ढवळे १४. विशाल कंक १५. कुणाल सहाणे १६. मनी तेवर १७. मुकुंद शेरकर १८. सागर मगर १९.अभि जीत जाधव २०. अजय गायकवाड. २१. सौ.शबाना मुलाणी २२.प्रदीप रामचंद्र भापकर.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४३ विषय क्र. ४

दि. १६/९/२०१५ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.विनय गायकवाड अनुमोदक: मा. स्वाती मयुर कलाटे

संदर्भ :- मा. विनय उर्फ विनायक गायकवाड यांचा दि. १६/९/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मनपाच्या वाकड प्रभागातील संत तुकाराम मंगल कार्यालयाजवळून २४.०० मी.डी.पी.रोड झालेला आहे. या रस्त्यास १४/८/२०१४ रोजी कै.शंकरराव श्रीपतराव गायकवाड असे नांव देवून ठराव मंजूर करणेत आलेला होता. परंतु येथील स्थानिक नागरीकांचा यांस कडाडुन विरोध आहे त्यामुळे नागरीकांच्या विचारातून हा ठराव रदद करुन या रस्त्यास जगदगुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज मार्ग असे नांव देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४४ विषय क्र. ५

दि. १६/९/२०१५ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.आशा सुर्यवशी अनुमोदक: मा.विनय गायकवाड

संदर्भ :- मा. आशा सुर्यवंशी यांचा दिनांक १६/९/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २० मध्ये बिजलीनगर हनुमान स्वीट समोरील चौकास कै.रामभाऊ पिराजी सुर्यवंशी चौक असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४५ विषय क्र. ६

दि. १६/९/२०१५ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा. विजय शिंदे अनुमोदक: मा. विनय गायकवाड

संदर्भ :- मा. विजय शिंदे यांचा दिनांक १६/९/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रत्येक प्रभागात दोन सदस्य आहेत त्यानुसार प्रभागात रस्ते, क्रिंडागण, चौक, उदयान व इतर ठिकाणी नांवे देणेबाबत ठराव करतेवेळी जो प्रस्ताव येतो त्यांस प्रस्तावास स्थानिक दोन्ही नगरसदस्यांची

सही असलेले पत्र व उपस्थीती असल्याशि वाय विषय घेवू नये. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४६ — विषय क्र. ७

दि. १६/९/२०१५ — विभाग – १) स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
२) बी आर टी विभाग
३) पीएमपीएल

सुचक : मा. माया संतोष बारणे — अनुमोदक: मा. स्वाती मयुर कलाटे

संदर्भ :- मा. माया संतोष बारणे यांचा दि.१६/९/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

सांगवी फाटा रावेत बी.आर.टी.संचालनासाठी बसस्थानकाची नांवे निश्चीत करण्यात आली असून. सदर ठिकाणी बसस्टॉप उभारणी केल्यानंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिका कडून बसस्टॉपची यादी दिलेली होती. सध्यस्थीतीला सोळानंबर हे बसस्टॉपचे नांव देण्यात आले आहे. परंतु सोळानंबर हा बसस्टॉप हा सध्या अस्तित्वात नाही. सध्या बी.आर.टी.ने जो बसस्टॉप बांधला आहे तो संतोषनगरच्या हददीत येत आहे. तरी सोळानंबरचे नांव वगळुन सदर बी आर टी बसस्टॉपला संतोषनगर असे नांव देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४७ — विषय क्र. ८

दि. १६/९/२०१५ — विभाग – १) स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
२) वैदयकिय विभाग

सुचक : मा. छाया साबळे — अनुमोदक: मा.शेखर ओव्हाळ

संदर्भ :- मा. छाय साबळे यांचा दिनांक १६/९/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

दिनांक १९/८/२०१५ रोजी मंजूर झालेला ठराव क्रमांक ३० रदद करुन नविन ठराव मंजूर करुन मुस्लीम कब्रस्तानला नविन नामकरणामध्ये हजरत उस्माने गणी कब्रस्थान असे नांव देण्यास तसेच सन्मा.नगरसेविका सौ.छायाताई जगन्नाथ साबळे शहर सुधारणा सभापती यांचे प्रयत्नातून अशा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४८ — विषय क्र. ९

दि. १६/९/२०१५ — विभाग – १) स्थापत्य अतिक्रमण
२) आकाश चिन्ह परवाना विभाग

सुचक : मा.आशाताई सुर्यवंशी — अनुमोदक: मा. आश्विनी चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांचा दि.१६/९/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

ब प्रभाग समिती कार्यक्षेत्रामध्ये काही ठिकाणी अनाधिकृतपणे आकाश चिन्ह व जाहिरात फलक आहेत. अशा आढळून येणारे अनाधिकृत आकाश चिन्ह व जाहीरात फलक आकाश चिन्ह व परवाना परवाना निरिक्षकामार्फत काढणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४९ विषय क्र. १०
दि. १६/९/२०१५ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. शेखर ओव्हाळ अनुमोदक: मा. आश्विनी चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांचा दि. १६/९/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २३ केशवनगर येथे राजपार्क चौक येतो त्या चौकात संग्राम चौगुले यांची जिम असून, तेथे बजाज सर्व्हीसेसचे गॅरेज आहे त्या चौकास कै.सुरेश काका गावडे चौक असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता तात्काळ मंजूर करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ १७९ /२०१५.
दिनांक : १७ /१० /२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना